# जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी, हिंगोली यांचे कार्यालय.

पत्ता:- जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली (निवडणूक शाखा), नवीन प्रशासकीय इमारत, नांदेड रोड, हिंगोली
फोन नं. (02456) 221456 फॅक्स नं. 221456 ईमेल dydeohingoli@gmail.com

************************************************************************

**छायाचित्र मतदार यादी छपाईकरिता ई- निविदा सुचना क्रमांक: 1/2020 दिनांक: 09/09/2020**

************************************************************************

हिंगोली जिल्ह्यातील (92- वसमत, 93- कळमनुरी व 94- हिंगोली) या तीन विधानसभा मतदार संघाच्या छायाचित्र मतदार याद्यांची छपाई करण्यासाठी अनुभवी व सुयोग्य अभिकर्ता तथा पुरवठादार यांचेकडून विहीत नमुन्यातील ई-निविदा, https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावरील ई- निविदा प्रणालीद्वारे मागविण्यात येत आहेत.

**कामाचे नांव:- हिंगोली जिल्ह्यातील (92- वसमत, 93- कळमनुरी व 94- हिंगोली) या तीन विधानसभां मतदार संघाच्या छायाचित्र मतदार याद्या व निवडणूक विषयक इतर कागदपत्रांची पी.डी.एफ. सी.डी. वरून छपाई (स्टॅपलिंग व बायडींगसह) करून निर्देशित ठिकाणी पुरवठा करणे.**

**कामाची अंदाजित:- किंमत रूपये 10,00,000/- (अक्षरी रूपये दहा लाख केवळ.)**

| | |
|---|---|
| ई- निविदा फॉर्म फी | रू. 1,000/- (अक्षरी रूपये एक हजार केवळ.) |
| इसारा रक्कम 1% | रू. 10,000/- (अक्षरी रूपये दहा हजार केवळ.) |
| सुरक्षा अनामत रक्कम 3% | रू. 30,000/- (अक्षरी रूपये तीस हजार केवळ.) |
| ई- निविदा प्रसिध्द करणे | दिनांक: 09/09/2020, वेळ: दुपारी 03:00 वाजता |
| ई- निविदा अर्ज उपलब्धिचा कालावधी | दिनांक: 09/09/2020, वेळ: दुपारी 03:00 वाजता पासून ते दिनांक: 14/09/2020 रोजी दुपारी 03:00 वाजेपर्यंत |
| ई- निविदा पुर्व बैठक | दिनांक: 11/09/2020 रोजी सकाळी 11:00 वाजता.<br>(उपजिल्हा निवडणूक अधिकारी, हिंगोली यांचे दालनात) |
| संपर्क अधिकारी | श्री. गोविंद रणविरकर, उपजिल्हा निवडणूक अधिकारी, हिंगोली.<br>फोन नं. (02456) 221456 ईमेल- dydeohingoli@gmail.com |
| ई- निविदा ऑनलाईन सादर करण्याचा अंतिम दिनांक | दिनांक: 14/09/2020 रोजी दुपारी 03:00 वाजेपर्यंत |
| ई- निविदा उघडणेचा दिनांक वेळ | दिनांक: 15/09/2020 रोजी दुपारी 03:00 वाजता |
| ई- निविदा उघडण्याचे ठिकाण | उपजिल्हा निवडणूक अधिकारी, हिंगोली यांचे दालन |

टिप:-

1) जे निविदाधारक आपल्या ई- निविदा https://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर विहीत मुद्दतीत ऑनलाईन सादर करतील व सादर केलेल्या निविदा प्रत्यक्ष जिल्हा निवडणूक शाखेकडे ई-निविदा उघण्याच्या वेळे पुर्वी (निविदेच्या अटी , शर्ती व तांत्रिक लिफाफ्यात टाकावयाचे साक्षांकीत कागदपत्रे) सादर करतील त्याच निविदाधारकांच्या ई- निविदांचा विचार केला जाईल याची सर्व निविदाधारकांनी नोंद घ्यावी.

2) प्राप्त ई- निविदा, कारणे न- देता स्विकारणे अथवा नाकारण्याचे अधिकार जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी, हिंगोली यांनी राखून ठेवले आहेत.

3) ई- निविदेच्या अटी व शर्ती अर्जासोबत उपलब्ध करून देण्यात येतील. सदरची ई- निविदा कोणत्याही किमान कामाचा हक्क प्रस्थापित करत नाही.

4) सदर ई- निविदा ऑनलाईन स्वरूपाची असल्यामुळे डिजीटल सिग्नेचर असणे आवश्यक आहे. ई- निविदेचा सर्व तपशिल, अटी व शर्ती https://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. तसेच भविष्यातील सूचना, प्रसिध्दी, शुध्दीपत्रके इत्यादी माहिती उपरोक्त संकेत स्थळावरच उपलब्ध करून देण्यात येईल.

5) ई- निविदा फॉर्म फी (E-Tender Fee), इसारा रक्कम (EMD) या दोन्ही रक्कमा फक्त ऑनलाईन पेमेंटव्दारेच (नेट बँकिंगव्दारेच) स्विकारल्या जातील.

6) निविदाधारकाची वार्षिक उलाढाल रूपये 5,00,000/- (रूपये पाच लाख केवळ.) पेक्षा जास्त असणे आवश्यक असून, आर्थिक वर्ष सन 2016-17, 2017-18 आणि 2018-19 या वर्षाचे वार्षिक उलाढालीबाबतचे मान्यताप्राप्त सनदी लेखापाल (CA) यांचेकडील प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

7) निविदाधारकांस छायाचित्र मतदार याद्या, व्होटर स्लिप्स, इलेक्टर रोल चेक लिस्ट, बीएलओ रजिस्टर, इत्यादी निवडणूक विषयक छपाई कामाचा अनुभव असणे आवश्यक राहील.

8) अती तातडीचे प्रसंगी आवश्यकता पडल्यास मतदार याद्या व इतर निवडणूक विषयक कागदपत्रांची छपाई जिल्हा निवडणूक कार्यालय, हिंगोली येथे करावी लागेल.

9) ई- निविदेतील कामाबाबतची तांत्रिक वैशिष्ट्ये पुढिलप्रमाणे आहेत:-

i) छायाचित्र मतदार यादीची छपाई (Printing) पानाच्या (Page) दोन्ही बाजूने (Back to Back) असणे आवश्यक आहे. (कव्हरपेज वगळून)

ii) मतदार याद्या छपाई A-4 साईजच्या, 70 gsm Bright White. पेपरवर करावी लागेल.

iii) मतदार याद्या छपाईची प्रिंटीग क्वालीटी 600DIP असणे आवश्यक आहे.

iv) या कार्यालयाने तयार करून दिलेल्या मतदार यादीच्या मुख्य पृष्ठची छपाई A-4 साईजच्या जाड कागदावर करावी लागेल. यासाठी अतिरीक्त खर्च अनुज्ञेय असणार नाही.

v) मतदान केंद्रनिहाय व PDF सीडीमध्ये प्राप्त झालेल्या क्रमानुसार क्रमाक्रमाने लावून मतदार याद्यांची डाव्या हाताची बायंडीग करणे आवश्यक आहे. बायंडीगचा अतिरीक्त खर्च अनुज्ञेय असणार नाही.

(रूचेश जयवंशी)
**जिल्हाधिकारी तथा**
**जिल्हा निवडणूक अधिकारी,**
**हिंगोली.**

# जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी, हिंगोली यांचे कार्यालय.

पत्ता:- जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली (निवडणूक शाखा), नवीन प्रशासकीय इमारत, नांदेड रोड, हिंगोली

फोन नं. (02456) 221456 फॅक्स नं. 221456 ईमेल dydeohingoli@gmail.com


******************************************************************************

**कामाचे नांव:- हिंगोली जिल्ह्यातील (92- वसमत, 93- कळमनुरी व 94- हिंगोली) या तीन विधानसभा मतदार संघाच्या छायाचित्र मतदार याद्या व निवडणूक विषयक इतर कागदपत्रांची पी.डी.एफ. सी.डी. वरून छपाई (स्टॅपलिंग व बायडींगसह) करून निर्देशित ठिकाणी पुरवठा करणे.**

## -: ई- निविदेच्या अटी व शर्ती :-

जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी, हिंगोली जिल्हा यांचेकडून 92- वसमत, 93- कळमनुरी व 94- हिंगोली या तीन विधानसभा मतदार संघाच्या छायाचित्र मतदार याद्या व निवडणूक विषयक इतर कागदपत्रांचे छपाई करिता सुयोग्य व अनुभवी पुरवठादार/ अभिकर्ते यांचेकडून दोन लिफाफा (Two bid) पध्दतीने ई- निविदा मागविण्यात येत आहे. सर्व तीनही विधानसभा मतदार संघासाठीच्या संपूर्ण कामासाठी निविदाकारांनी ई- निविदा सादर करणे आवश्यक आहे. कोणत्याही एका विशिष्ट विधानसभा मतदारसंघ क्षेत्रासाठी ई- निविदा सादर करता येणार नाही. या कामासाठी खाली नमूद केलेल्या अटी/ शर्ती लागू राहतील.

1) ई- निविदा अर्ज https://mahatenders.gov.in या संकेत स्थळावरून डाऊनलोड करून त्याच संकेतस्थळावर सादर करणे आवश्यक आहे. ई- निविदेची फी रू. 1,000/- (अक्षरी रूपये एक हजार केवळ.) संकेतस्थळावरील ऑनलाईन पेमेंट सुविधाद्वारे जमा करणे आवश्यक आहे.
2) ई- निविदा स्विकृतीचा अंतिम दिनांक: 14/09/2020 असून त्या दिवशी दुपारी 03:00 वाजेपर्यंतच ऑनलाईन ई- निविदा स्विकृत केल्या जातील. प्राप्त ई- निविदा दिनांक: 15/09/2020 रोजी दुपारी 03:00 वाजता उपजिल्हा निवडणूक अधिकारी, हिंगोली यांचे समक्ष उघडण्यात येतील. ई- निविदा उघडण्याच्या तारखेला काही अपरिहार्य/ तांत्रिक कारणामुळे ई- निविदा उघडता न आल्यास मा. जिल्हाधिकारी निर्देश देतील त्या तारखेला ई- निविदा उघडण्यात येईल.
3) ई- निविदा पूर्व बैठक (प्री-बीड कान्फरन्स) दिनांक: 11/09/2020 रोजी दुपारी 11:00 वाजता उपजिल्हा निवडणूक अधिकारी, हिंगोली यांचे दालनात घेण्यात येईल.
4) निविदाकाराने दिलेल्या विहीत मुदतीत ऑनलाईन ई- निविदा अर्ज, निविदेसाठी आवश्यक सर्व कागदपत्रे अपलोड करणे आवश्यक आहे. तसेच ई- निविदा अर्ज फी (E- Tender Fee) व बयाना/ इसारा (EMD) रक्कम ऑनलाईन पेमेंट व्दारे भरणा करणे आवश्यक आहे.
5) ऑनलाईन ई- निविदा, तांत्रिक लिफाफा तसेच ई- निविदा अर्ज फी (Tender Fee) व बयाना/ इसारा (EMD) रक्कम यांचे ऑनलाईन पेमेंट विहीत मुदतीत न- झाल्यास सदर निविदेचा विचार केला जाणार नाही.
6) बयाना/ इसारा (EMD) व सुरक्षा अनामत रक्कमेवर कोणतेही व्याज देय असणार नाही.
7) नामंजूर ई- निविदेबाबत बयाना/ इसारा (EMD) ही ई- निविदा प्रक्रिया पूर्ण झालेनंतर परत करणेत येईल.

8) ज्या निविदाकाराची ई- निविदा मंजूर होईल त्यांना पाच (05) दिवसांच्या आत करारनामा व सुरक्षा अनामत रूपये 30,000/- (अक्षरी रूपये तीस हजार केवळ.) हिंगोली येथे देय असलेल्या राष्ट्रीयकृत बँकेच्या Demand Draft स्वरूपात ***उपजिल्हा निवडणूक अधिकारी, हिंगोली*** यांचे नावे सादर करणे आवश्यक आहे. मंजूर निविदाकाराचा सुरक्षा अनामत रक्कमेचा Demand Draft काम समाधानकारकरित्या पूर्ण केल्यानंतरच परत करण्यात येईल.

9) मंजूर निविदाकार विहीत मुदतीत काम करण्यास असमर्थ ठरल्यास अथवा दोषपूर्ण काम केल्यास अथवा निविदेतील अटी व शर्ती पाळण्यास असमर्थ ठरल्यास मा. जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी, हिंगोली ठरवतील अशी उचीत कार्यवाही (सुरक्षा अनामत रक्कम जप्त करणे, निविदा रद्द करणे इत्यादी) करण्यात येईल.

10) प्राप्त ई- निविदा मंजूर करणे अगर नाकारणे आणि आवश्यक वाटल्यास विभागून देणे, शर्ती बदलणे तसेच काही बाबी वगळून आवश्यक वाटतील तेवढ्याच बाबींचा पुरवठा आदेश देण्याचे अधिकार मा. जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी, हिंगोली यांनी राखून ठेवले आहेत.

11) तांत्रिक लिफाफ्यात सादर केलेल्या कागदपत्रांच्या विषयी कोणतेही स्पष्टीकरण आवश्यक वाटल्यास मा. जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी, हिंगोली लेखी मागवतील. तसे स्पष्टीकरण सादर करणे निविदाकारावर बंधन कारक राहील.

12) तांत्रिक लिफाफ्यात सादर केलेल्या सर्व कागदपत्रांच्या मूळ प्रती निविदा उघडण्याच्या दिनांकाचे दिवशी तपासणीसाठी सादर करणे बंधकारक राहील.

13) ई- निविदा अर्ज व त्याच्याशी संबंधीत कागदपत्रे अहस्तांरणीय आहेत.

14) ई- निविदेची वैधता निविदा मंजूर झालेपासून एक वर्षाची राहील.

15) मंजूर निविदाकाराचा छपाई कामाचा कालावधी कार्यारंभ आदेशाच्या दिनांका पासून एक वर्षाचा राहील, छपाई कामाचा कालावधी कमी- अधिक करण्याचे अधिकार मा. जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी, हिंगोली यांचा राहील.

16) ई- निविदेतील कामाबाबतची तांत्रिक वैशिष्ट्ये पुढिलप्रमाणे आहेत:-

   vi) छायाचित्र मतदार यादीची छपाई (Printing) पानाच्या (Page) दोन्ही बाजूने (Back to Back) असणे आवश्यक आहे. (कव्हरपेज वगळून)

   vii) मतदार याद्या छपाई A-4 साईजच्या, 70 gsm Bright White. पेपरवर करावी लागेल.

   viii) मतदार याद्या छपाईची प्रिंटीग क्वालीटी 600DIP असणे आवश्यक आहे.

   ix) या कार्यालयाने तयार करून दिलेल्या मतदार यादीच्या मुख्य पृष्ठची छपाई A-4 साईजच्या जाड कागदावर करावी लागेल. यासाठी अतिरीक्त खर्च अनुज्ञेय असणार नाही.

   x) मतदान केंद्रनिहाय व PDF सीडीमध्ये प्राप्त झालेल्या क्रमानुसार क्रमाक्रमाने लावून मतदार याद्यांची डाव्या हाताची बायंडीग करणे आवश्यक आहे. बायंडीगचा अतिरीक्त खर्च अनुज्ञेय असणार नाही.

17) निविदाकाराणे त्याच्या वतीने निविदेवर स्वाक्षरी करण्यास, निविदेसंबंधीच्या बैठकींना उपस्थित राहण्यास, किंवा तांत्रिक व इतर माहिती पुरविण्यासाठी कोणत्याही व्यक्तीची नियुक्ती केली असल्यास त्या संबंधीचे निविदाकाराचे लेखी प्राधिकारपत्र (Bidders Power of Attorney) संबंधीत निविदाकाराने सादर करणे बंधनकारक राहील.

18) काम पुर्ण झाल्यानंतर व मतदार याद्यांचा पुरवठा निर्देशित केल्या ठिकाणी सुस्थितीत व दिलेल्या संखेप्रमाणे पोहच झाल्यानंतर तसेच छायाचित्र मतदार याद्या सदोष नसल्यासच देयकाची रक्कम अदा करणेत येईल. वाहतूकीसाठी वेगळा खर्च देय होणार नाही.

19) मतदार याद्या व इतर छपाईचे काम विहित मुदतीत पूर्ण करणे आवश्यक आहे. तसेच सदरच्या कामातील बाबनिहाय दिलेल्या तांत्रिक वैशिष्टासह, परिणामकारक, कार्यारंभ आदेशामध्ये देण्यात आलेल्या सूचना व संख्या यांचे पालन करणे निविदाकारावर बंधनकारक राहील.

20) पुरवठा करावयाचे साहित्य/ सामुग्री पदनिर्देशित ठिकाणापर्यंत पोहचण्यापुर्वी नैसर्गिक आपत्ती अगर इतर कारणामुळे खराब झाल्यास व इतर नुकसान झाल्यास त्यास निविदाकार सर्वस्वी जबाबदार राहील.

21) निविदाकारास कोणत्याही प्रकारचे अग्रीम (Advance) देण्यात येणार नाही.

22) निविदाकार स्वत:, त्यांची संस्था किंवा सदर कामासी संबंधीत असलेल्या इतर कोणत्याही व्यक्ती/ संस्था, कोणत्याही राजकीय पक्षांशी संबंधीत असता कामा नये. तसेच निवडणूकिचे कामाविषयक गोपनियतेचे पालन करणे आवश्यक आहे. जर या अटींचा भंग झाल्याचे अढळून आल्यास निविदा धारकाची निविदा रद्द केली जाईल. तसेच त्यांचेवर फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येईल. तसेच अनामत रक्कम जप्त करण्यात येईल.

23) सशर्त ई- निविदा विचारत घेतल्या जाणार नाहीत.

24) या ई- निविदेतील कामाचे परिमाण कमी जास्त होवू शकते.

25) छपाई करून पुरविण्यात आलेल्या मतदार याद्या व इतर कागदपत्रे सदोष अढळल्यास त्याची जबाबदार निविदाकाराची राहील व त्याचे पुनर्मुद्रण विनामुल्य करून देण्याची जबाबदारी निविदाकाराची राहील.

26) शासन नियमाप्रमाणे देयकातून आयकर/ सेवाकराची रक्कम व त्यावरील सरचार्ज कापून घेण्यात येईल. आयकर खात्याने अतिरीक्त आयकर अथवा व्याजाची किंवा दोन्हीची मागणी केल्यास त्याची भरपाई निविदाकारास करावी लागेल.

27) जिल्ह्यात/ जिल्ह्याबाहेरून साहित्याची वाहतूक करताना द्यावा लागणार पथकर अथवा इतर कोणताही कर निविदाकारास भरावा लागेल.

28) निविदा प्रक्रियेच्या दरम्यान किंवा निविदा स्विकृती नंतर कोणताही विवाद उद्‌भवल्यास मा. जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी हिंगोली यांचा निर्णय अंतिम राहिल व तो सर्वांना बंधनकारक राहिल.

29) निविदा स्विकृत करण्यात आलेल्या व काम व्यवस्थितरित्या पुर्ण करून दिलेल्या निविदाकारास द्यावयाची देयकाची रक्कम ही शासनाकडून निधी प्राप्त झाल्यानंतर अदा करण्यात येईल तसेच त्यावर कोणतेही व्याज दिले जाणार नाही.

30) ई- निविदे दरम्यान किंवा निविदा स्विकृती नंतर कोणतेही कायदे विषयक वाद/ विवाद उद्‌भवल्यास सदर वाद/ विवाद हिंगोली कोर्टाचे कार्यक्षेत्रातच राहतील.

31) छायाचित्र मतदार याद्यांच्या PDF CD व छपाई करण्यात आलेल्या छायाचित्र मतदार याद्या व इतर कागदपत्रे हे मा. भारत निवडणूक आयोगाची मालमत्ता आहे. छायाचित्र मतदार याद्या व त्यासंबंधीत सर्व बाबी, छपाईचे काम पुर्ण झाल्यानंतर लगेचच जिल्हाधिकारी कार्यालय, निवडणूक शाखा, हिंगोली येथे परत करणे बंधनकारक आहे. सदर साहित्य कोणत्याही स्वरूपात निविदाकारास स्वत: जवळ

ठेवण्याचा अधिकार असणार नाही. तसेच ही माहिती निविदाकार छपाईचे कालावधीमध्ये कोणासही देवू अगर विक्री करू शकणार नाही.

32) ई- निविदेतील अटी व शर्तीचे उल्लंघन केल्यास निविदाकार फौजदारी कार्यवाहीस पात्र राहतील तसेच त्यांची सुरक्षा अनामत रक्कम जप्त करणे, झालेल्या कामाचे देयक अंशत: अथवा पुर्णत: नाकारणे अथवा रोकणे, निविदाकारास काळ्या यादीत टाकणे हे सर्व अधिकार मा. जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी, हिंगोली यांना राहतील.

33) ई- निविदेचे पुढिल प्रमाणे दोन लिफाफे असतील.

***अ) ई- निविदेचा तांत्रिक लिफाफा:- <u>या लिफाफ्यात स्वाक्षरी करून रबरी शिक्का मारलेली खालीलप्रमाणे कागदपत्रे असणे (अपलोड करणे) आवश्यक आहे.</u>***

1) ई- निविदा अर्ज फी (Tender Fee) रक्कम रू. 1,000/- (अक्षरी रूपये एक हजार केवळ.) व इसारा/ बयाणा (EMD) रक्कम रू. 10,000/- (अक्षरी रूपये दहा हजार केवळ.) ऑनलाईन पध्दतीने जमा केल्याबाबतची पावती (Receipt).
2) वस्तू आणि सेवा कर (GST) नोंदणी प्रमाणपत्राची प्रत.
3) 31 *मार्च,* 2019 *पर्यंत वस्तू आणि सेवा कर (*GST) *भरणा केल्याबाबतचे प्रमाणपत्र.*
4) *व्यवसाय कर थकीत नसल्याबाबचे प्रमाणपत्र.*
5) आर्थिक वर्ष सन 2016-17, 2017-18 आणि 2018-19 या आर्थिक वर्षाचे आयकर विवरणपत्र.
6) निविदाकाराची वार्षिक उलाढाल रूपये 5,00,000/- किंवा त्यापेक्षा जास्त असल्याबाबतचे मान्यताप्राप्त सनदी लेखापाल (Chartered Accountant) यांनी प्रमाणित केलेले आर्थिक वर्ष सन 2016-17, 2017-18 आणि 2018-19 या वर्षाचे प्रमाणपत्र.
7) छायाचित्र मतदार यादी, व्होटर स्लिप्स, इलेक्ट्रर रोल चेक लिस्ट, बीएलओ रजिस्टर, इत्यादी निवडणूक विषयक छपाई कामाच्या अनुभवाचा तपशिल, कार्यारंभ आदेश आणि काम समाधानकारकरित्या पुर्ण केल्याबाबतचे प्रमाणपत्र.
8) साधनसामुग्री व मनुष्यबळाची माहितीचा फॉर्म नंबर I- Capability Statement (CS).
9) कामाचा अनुभव असल्याबातच्या तपशिलाचा फार्म नंबर II- Capability Statement (CS).
10) पॅनकार्डची साक्षांकित प्रत.
11) सक्षम प्राधिकारी यांनी निर्गमित केलेले (अद्यावत नुतनिकरणासह ) नोंदणी प्रमाणपत्र (Shop Act Registration Certificate) जर संस्था ग्रामपंचायत हद्दीमध्ये असेल तर ग्रामपंचायतचे ना-हरकत प्रमाणपत्रची साक्षांकित प्रत.
12) ***कोणत्याही शासकीय/ निमशासकीय विभाग/ कार्यालयाच्या कामाच्या बाबतीत काळ्या यादीमध्ये (Black List) समावेश न-केल्याबाबतचे, तसेच भारतीय दंड विधान सहिंतेच्या कोणत्याही कलमान्वये शिक्षा झाली नसल्याचे, तसेच कोणताही फौजदारी स्वरूपाचा गुन्हा दाखल नसल्याचे व निविदेतील अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचे रूपये 100/- रूपयाच्या स्टॅम्प पेपरवर सक्षम प्राधिकारी यांचे समक्ष केलेले शपथपत्र (Affidavit).***

13) यापुर्वी सादर केलेल्या असल्यास अशा ई- निविदा तसेच मंजूर होवून प्रलंबित असलेल्या ई- निविदेच्या तपशिलाचे विवरणपत्र Form- III व Form- IV.

**वरील 1 ते 11 मध्ये नमुद केलेली कागदपत्रे व अटी अत्यावश्यक असून त्या पुर्ण करू न-शकणाऱ्या निविदाकाराची निविदा रद्द करण्यात येईल व त्याचा दराचा लिफाफा (BOQ) उघडण्यात येणार नाही.**

**ब) व्यापारी दराचा लिफाफा:-**

1) ई- निविदाकाराने दिलेल्या कामाचे दर हे BOQ (Bill of Quantity) मध्ये भरत असताना सदरचे दर हे सर्व करासहीत भरणे आवश्यक आहे.
2) छायाचित्र मतदार याद्या तसेच इतर छपाईचे दर **(I) एक बाजू छपाई दर (Single Page) (स्टॅपलिंग व बायंडींगसह) आणि (II) पाठपोट छपाई दर (Back to Back) (स्टॅपलिंग व बायंडींगसह)** प्रमाणे प्रतीपृष्ठ दर नमूद करणे आवश्यक आहे.
3) ई- निविदाधारकाचे/ फर्मचे संपूर्ण नांवाचा तपशिल BOQ मध्ये नमूद करणे आवश्यक आहे.
4) व्यापारी दराच्या लिफाफ्यामध्ये (BOQ) नमुद दरा व्यतीरीक्त कोणत्याही प्रकारची वाढीव रक्कम/ वाढीव खर्च (वस्तू, सेवा कर, वाहतूक खर्च, हमाली, मेंटनन्स खर्च किंवा इतर कर व खर्च) मागणी केल्यास असा कोणताही वाढिव खर्च दिला जाणार नाही.
5) ज्या ई- निविदेमध्ये निश्चित दर दिलेले नसतील अथवा दिलेल्या दरांमध्ये संदिग्धता असेल अशी निविदा नाकारली जाण्यास पात्र ठरेल. अक्षरी व अंकी दरांमध्ये तफावत असल्यास दोन्ही पैकी जो दर कमी असेल तो दर विचारात घेतला जाईल.
6) सर्वात कमी दर असलेल्या ई- निविदेचे दर वाजवी / बाजार भावास अनुरूप नसल्यास, याबाबत मा. जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी, हिंगोली यांनी घेतलेला निर्णय अंतिम असेल. व तो सर्वांवर बंधनकारक राहील.

**Form- I**

**CAPBILITY STATEMENT (CS)**

1. Name & Address of the Tenderer:-

Phone No.:- E-mail:-

Mobile No.:- Web site:-

2.1 Infrastructure Set Up :-

| Details of Items | Number of Quantity | Specification |
|---|---|---|
| Computers | | |
| Printers/ Copiers | | |
| | | |
| | | |
| | | |
| Total | | |

2.2 Manpower:-

| Sr. No. | Number of Quantity | Professional Qualification | Printing Experience |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |

3 Other Branches/ Offices of the tenderer in the Maharashtra State

4 Give Organization chart for following indicating various levels

**Signature of Tenderer/s along with Seal**

**Form- II**

**Details of work of similar type and magnitude carried out by the tenderer**

| Sr. No | Name of work | Work Allotted by | Volume of Printing Job handled | Time Period | Location | Remarks |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| | | | | | | |

**Signature of Tenderer/s along with Seal**

**Form- III**

**List of works tendered for and in hand as on the date of submission of tender**

| Sr. No | Name of Work | Place of Work | Work in hand Tendered Cost | Cost of Remaining Work | Anticipated Date of Completion | Work Tendered for Estimated Cost | Date when Decision Expected | Stipulated Date for Period of Complation | Remarks |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 |
| | | | | | | | | | |

**Signature of Tenderer/s along with Seal**

## Form- IV

## Details of other major works carried out by tenderer

| Sr. No | Name of work | Tender Cost of the Work | Place of Work | Time in which Completed | Actual Date of Completion | Remarks |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| | | | | | | |

**Signature of Tenderer/s along with Seal**

Signature Not Verified

Digitally signed by Govind Ganpatrao Ranvirkar
Date: 2020.09.09 14:38:44 IST
Location: Maharashtra-MH